सकाळ



भडगाव : शिंदे अभियांत्रिकीमधील कार्यक्रमात शोएब अत्तार यांचा सत्कार डॉ. डी. व्ही. घेवडे यांच्या हस्ते झाला. यावेळी तनाज मोमीन, अरमान अल्तेकर, सैफान कडेगावकर आदी उपस्थित होते.

# शिंदे अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्लेसमेंट प्रशिक्षणाची सांगता

गडहिंग्लज, ता. २१ : भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागातर्फे तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याच्या प्लेसमेंट प्रशिक्षण कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांच्या भरती प्रक्रियेस सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे होते.

प्रशिक्षक शोएब अत्तार, तनाज मोमीन, अरमान अल्तेकर, सैफान कडेगावकर यांनी विद्यार्थ्यांना परिमाणात्मक क्षमता, तार्किक विचार, गेमिंग फेऱ्या, कोडिंग-डिकोडिंग, मुलाखत कौशल्ये, संवाद कौशल्य, रेझ्युम लेखन, गटचर्चा व प्लेसमेंट प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध सराव चाचण्या, प्रश्नसंच आणि प्रत्यक्ष मुलाखतींचा अनुभव घेतला. प्राचार्य घेवडे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी तांत्रिक ज्ञानाबरोबरच संवाद कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्याची गरज आहे.'' प्रा. जी. एम. कुंभार यांनी प्रशिक्षणाची उद्दिष्टे सांगितली. प्रा. आय. टी. पटेल यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ए. एस. भोई यांनी आभार मानले.